THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

FRIDAY, 20TH APRIL 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**खालीं लिहिलेला मसुदा, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांच्या कायदेकानू करणाऱ्या मंडळीमध्यें तारीख २२ माहे मार्च सन १८९४ रोजीं रुजू केला :—**

### सन १८९४ चा नंबर ६.

**सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा याचीं कलमें ३६६ व ३७१ हीं सुधारण्याबाबदचा मसुदा.**

ज्याअर्थी सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचीं कलमें ३६६ व ३७१ हीं सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. सदरहू कायद्याच्या ३६६ व्या कलमाबद्दल पुढील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :— सन १८८२ चा आक्ट १० याच्या ३६६ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

" ३६६. अवल हुकुमतीच्या कोणत्याही फौजदारी कोर्टांतील दरेक इनसाफामध्यें फैसला सांगणें, किंवा अशा फैसल्याचा सारांश समजाविणें तो,— फैसला देण्याची रीत.

(अ) असा इनसाफ संपल्यावर लागेच किंवा पुढच्या कोणत्या तरी वेळाची पक्षकारांस किंवा त्यांच्या प्लीडरांस सूचना देऊन तशावेळीं उघड्या कोर्टांत, आणि

(ब) सदरहू कोर्टाच्या भाषेंत, किंवा आरोपितास किंवा त्याच्या प्लीडरास समजत असेल अशा दुसऱ्या कोणत्या तरी भाषेंत,

सांगितला पाहिजे, किंवा समजाविला पाहिजे.

आरोपित कैदेंत असून फैसला त्यास सोडून देण्याबाबदचा किंवा त्यानें अपराध केला नसल्याबाबदचा नसेल तर त्याला, फैसला देण्यांत येईल तो ऐकण्यासाठीं आणलें पाहिजे, किंवा तो कैदेंत नसून फैसला त्यास सोडून देण्याबाबदचा किंवा त्यानें अपराध केला नसल्याबाबदचा नसेल तर त्याला, फैसला देण्यांत येईल तो ऐकण्यासाठीं हजर होण्यास सांगण्याचा सदरहू कोर्टास अधिकार आहे.

सदरहू कोर्टास जें कारण पुरतें वाटेल व जें त्यानें दफ़्तरीं लिहून ठेविलें पाहिजे अशा कोणत्याही कारणाकरितां त्या कोर्टाला, कोणताही फैसला देण्याच्या संबंधाचीं या कलमाखालील आपलीं कामें, ज्या कोणत्याही दुसऱ्या कोर्टाच्या हुकुमतीच्या हद्दींत सदरहू आरोपित असेल त्या कोर्टाकडे सोंपण्याचा अधिकार आहे, आणि अशा दुसऱ्या कोर्टानें, या कलमांत अधिकार दिल्याप्रमाणें व फर्माविल्याप्रमाणें फैसला ज्या दिवशीं व जागीं देण्यांत येईल त्या दिवसाची व जागेची पक्षकारांस किंवा त्यांच्या प्लीडरांस सूचना देवविली पाहिजे, आणि जेव्हां फैसला देण्यांत येईल तेव्हां त्यावर तो दिल्याची तारीख व रीत यांबाबद दाखला लिहिला पाहिजे.

कोणत्याही फौजदारी कोर्टानें दिलेला कोणताही फैसला, तो देण्याबद्दल सूचना दिलेल्या दिवशीं किंवा जागीं कोणताही पक्षकार किंवा त्याचा प्लीडर हजर नव्हता, किंवा अशा दिवसाची व जागेची सूचना पक्षकारांस किंवा त्यांच्या प्लीडरांस किंवा त्यांपैकीं कोणत्याही असामीस देण्यामध्यें कोणतेंही वर्जन किंवा कसूर झाली, एवढ्याच कारणानें गैरकायदेशीर होतो असें समजूं नये.

आणि या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, कलम ९३७ यांतील ठरावांच्या व्याप्तीचा कोणत्याही प्रकारें संकोच होतो असें समजूं नये."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३७१व्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू कायद्याच्या ३७१ व्या कलमांत, "फैसला आरोपितास समजाविला पाहिजे, आणि त्यानें मागितली असतां त्या" या शब्दांच्या बदला "आरोपितानें मागितली असतां" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या २६ व्या बाबींतील ठरावांपैकीं कांहीं ठराव लागू करतांना व्यवहारांत कित्येक अडचणी उत्पन्न होतात त्यांबाबद सन १८९२ सालीं वायव्य प्रांताकडून हिंदुस्थान सरकारास लिहून आल्यावरून तें प्रकरण त्या सरकारानें त्याच सालीं स्थानिक सरकारें, हाय् कोर्टें व इतर अधिकारी यांच्या अभिप्रायासाठीं पाठविलें होतें, आणि याच संबंधानें हा मसुदा तयार करण्यांत आला आहे.

प्रस्तुत मसुद्याच्या विषयाच्या संबंधानें सरकारास, इंडियन लॉ रिपोर्ट कलकत्ता, पुस्तक २१, पृष्ठ १२१ यावर प्रसिद्ध झालेला मुकदमा वाचण्याची नुकतीच संधि मिळाली आहे.

ए. इ. मिलर.

तारीख १७ माहे मार्च सन १८९४.

एस्. हार्व्हे जेम्स्,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.